महाराष्ट्र शासन
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,
जिल्हा व सत्र न्यायालय, गोंदिया
ई—मेल आयडी — dlsagondia@gmail.com
दुरध्वनी क्र. ०७१८२ २३८२३४, भ्रमणध्वनी क्र. ८५९१९ ०३९३५

## जाहिरात / सुचना

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गोंदिया यांचे कार्यालयीन कामकाजाकरीता ३ सफाईगार कामगार पदांची सेवा बाह्य यंत्रणेद्वारे एका वर्षाच्या कालावधीसाठी घेणेहेतु जाहिरात प्रसीध्द करण्यात येत आहे. याकरीता इच्छुक नोंदणीकृत कंत्राटदारांकडून दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

विस्तृत निविदा व त्यासंबंधीच्या अटी व शर्तीसह दिनांक २६/०७/२०२३ रोजी सकाळी ११.०० वा. पासून ते दिनांक ०३/०८/२०२३ रोजी दुपारी १.३० वाजेपर्यंत प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालय, गोंदिया चे http://districts.ecourts.gov.in/gondia या संकेतस्थळावर तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय, गोंदिया यांचे नोटीस बोर्ड वरती उपलब्ध आहेत.

(ए. टी. वानखेडे)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश तथा
अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गोंदिया

स्थळ :— गोंदिया
दिनांक :— २६/०७/२०२३

Scanned with OKEN Scanner

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय,गोंदिया

दरपत्रक कार्यप्रणाली सूचना क्र....../२०२३ District Legal Services Authority, Gondia, २०२३–२४ अंतर्गत जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गोंदिया (दूरध्वनी क्र. ०७१८२ २३८२३४, भ्रमणध्वनी क्र. ८५९१९ ०३९३५) येथे एक वर्ष मुदतीच्या कालावधीकरीता सफाईगार २ व मजुर १ असे एकत्रीत एकुण ०३ (सफाईचे लागणारे साहित्यासह) पदांच्या कंत्राटी पध्दतीने सेवा उपलब्धतेसाठी दरपत्रक पात्र निविदाकारांकडून दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे ठिकाण | कामाचे स्वरूप | शासन निर्णयाप्रमाणे पद संख्या | १ वर्षाकरीता कामाची अंदाजित रक्कम रुपये (लागणारे साहित्यासह) सर्वकरा व्यतिरीक्त |
|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गोंदिया | जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गोंदिया येथील अंतर्गत न्यायाधिश यांचे प्रसाधनगृहात साफसफाई, स्वच्छता करणे तसेच न्यायालयातील परीसरातील प्रसाधनगृहात साफसफाई व स्वच्छता करणे तसेच तत्सम नेमुण दिलेले कामांकरीता सफाईगार व मजुर या पदाची सेवा बाह्य यंत्रणेद्वारे कंत्राटी पध्दतीने उपलब्ध करून देणे. | पदसंख्या — सफाईगार — २ मजूर — १ असे एकुण ०३ | ५,८१,३६०/— |
| | | | एकूण | ५,८१,३६०/— |

**टिप :—**

१) सदर दरपत्रक हे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गोंदिया येथील सफाईगार २ व मजुर १ असे एकत्रीत एकुण ०३ या पदांकरीता एकत्रित समजण्यात यावी.

२) दरपत्रक फी रू. ३४००/— District Legal Services Authority, Gondia या नावाने DD द्वारे भरावे.

३) दरपत्रक सादर करतांना एकत्रित इसारा रक्कम रू. १७,०००/—चे DD द्वारे District Legal Services Authority, Gondia या नावान द्यावे. जर इसारा रक्कम भरणेपासून कायेदशीर सुट असेल तर त्या बाबतचे कागपत्रे कंत्राटदाराने तांत्रिक लिफाफयासोबत दाखल करावे.

४) फीस जमा व इसारा रक्कम चे DD द्वारे दिल्याची खात्री झाल्यानंतरच दरपत्रक लिफाफा उघडण्यात येईल.

५) दरपत्रक स्विकारण्याचा अधिकार किंवा कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व दरपत्रक नाकारण्याचा अधिकार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गोंदिया यांना असेल.

Scanned with OKEN Scanner

## : निविदेचे वेळापत्रक :

| अ.क्र | विवरण | | वेळ व दिनांक |
|---|---|---|---|
| १ | दरपत्रक दाखल करणेचा सुरूवातीचा दिनांक<br><br>दरपत्रक दाखल करणेचा समाप्तीचा दिनांक | : | २६/०७/२०२३ (वेळ स. ११.००वा)<br><br>०३/०८/२०२३ (वेळ दु. १.३० वा) |
| २ | तांत्रिक लिफाफा व आर्थिक दराचा लिफाफा सादर करण्याचे दिनांक<br><br>तांत्रिक लिफाफा व आर्थिक दराचा लिफाफा सादर करण्याचे ठिकाण | : | ०३/०८/२०२३ दुपारी २:२० वा.<br><br>मा. सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, विधी सेवा सदन,जिल्हा न्यायालय परीसर, गोंदिया |

टीप: १. सर्व इच्छुक निविदाकरांनी निविदा प्रक्रियेत भाग घेणेसाठी निविदा प्रणालीच्या संपुर्ण जाहिरात http://districts.ecourts.gov.in/gondia वर पाहावे.

२. संस्था कायदेशीर नोंदणीकृत कर भरणारी असावी.

३. सदर कामांची एक अथवा सर्व दरपत्रक कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गोंदिया यांना राखून ठेवलेले आहेत.

४. वरील निविदा व प्रक्रियेची पुढील माहिती http://districts.ecourts.gov.in/gondia या वेबसाईटवर पहायला मिळेल.

५. १. विधि व न्याय विभाग, शासन निर्णय पदनि—२५१२/प्र.क्र.१५७/क.१२ दिनांक ३ सप्टेंबर, २०१४

२. विधि व न्याय विभाग, शासन निर्णय पदनि—२५१२/प्र.क्र.१५७/क.१२ दि.०७/०१/२०१५

३. उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भाखस—२०१४/प्र.क्र.८२/भाग ३/उद्योग—४ दि ०१ डिसेंबर, २०१६

४. वित्त विभाग, शासन परीपत्रक क्रमांक—पदनि—२०१६/प्र.क्र.२९/१६/दि. २ /०८/२०२२

५. शासन निर्णय क्रमांक—पदनि—२०२२/प्र.क्र.१५/आ.पु.क दि. २७ एप्रिल,२०२२ या शासन निर्णयांच्या अधिन राहुन निविदा भरणेची आहे.

६. दरपत्रकाची रक्कम भरताना कोणत्याही कायद्याचे उल्लंघन होणार नाही याची जबाबदारी दरपत्रक भरणा—यांवर राहील.

७. दरपत्रक दाखल करण्यापुर्वी संबधीत संस्थेस यापुर्वी याच प्रकारचे काम केल्याचा कमीत कमी ३ वर्षाचा अनुभव असावा तसेच संबधीत संस्थेस शासनाने त्यांचे नाव काळया यादित टाकलेले नसावे.

(ए. टी. वानखेडे)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश तथा
अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गोंदिया

Scanned with OKEN Scanner

## अटी व शर्ती

**बयाना रक्कम (Earnest Money Deposit) - (Technical Bid envelop)**

खालील नमुद केलेल्या बाबींची पुर्तता निविदाकराकडुन न झाल्यास सदर निविदाकाराची बयाणा रक्कम जप्त करण्याचे अधिकार या कार्यालयास राहतील.

अ. दरपत्रक स्विकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर निविदा किंवा प्रस्ताव मागे घेणे किंवा त्यात फेरफार करणे.

ब. करारावर सही न करणे.

क. दरपत्रक किंवा प्रस्ताव स्विकारण्यात आल्यानंतर करारानुसार कामगिरीसाठी आवश्यक सुरक्षा अनामत न भरणे.

ड. दरपत्रक दस्तावेजामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे करारावर सही करण्यापुर्वी कोणत्याही अन्य अटींची पुर्तता न करणे.

**अनामत रक्कम –**

निविदाकाराला निविदा रक्कमेच्या ३ टक्के अनामत रक्कमेचा राष्ट्रीयकृत बॅंकेचा डिमांड ड्राफ्ट सचिव, जिल्हा विधि सेवा प्राधिकरण, गोंदिया या नावे जमा करावा लागेल.

**निविदा प्रक्रिया –**

दोन लिफाफे पध्दतीने सादर करावी लागेल. तांत्रिक निविदा लखोटा **(Technical Bid Envelop)** व आर्थिक निविदा लखोटा **(Financial Bid Envelop)** अशा दोन लखोटा पध्दतीत राहील. प्रत्येक लखोट्यावर तसे स्पष्ट शब्दात नमुद करावे.

**<u>अ) तांत्रिक निविदा ( लिफाफा क्रमांक – ०१ )</u>**

१) निविदा अर्जाचे शुल्क व बयाणा रक्कमेचा भरणा शासकीय नियमाप्रमाणे केला असणे आवश्यक. **(Tender Form Fee & E.M.D.)**

२) कंपनीचे/ संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र. **(Registration Certificate)**

Scanned with OKEN Scanner

३) पॅन कार्ड **(Pan Card)**

४) मागील तीन वर्षाचे आयकर प्रमाणपत्र व ताळेबंद उदा.

५) प्रोफेशनल टॅक्स **(Professional Tax)** प्रमाणपत्र.

६) सेवा कर **(GST Registration)** प्रमाणपत्र.

७) निविदाकाराने सफाईगार यांची सेवा केंद्र शासन/ महाराष्ट्र शासन वा इतर अन्य आस्थापनांमध्ये पुरविली असल्यास याबाबतचे संबंधित कार्यालयाचे जारी केलेले कार्यादेश आणि कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र सादर करावे. **(Experience Certificate)**

८) ई.पी.एफ. **(Employees Provident Fund)** नोंदणी प्रमाणपत्र.

९) ई.एस.आय.एस **(Employees State Insurance Scheme)** नोंदणी प्रमाणपत्र.

१०) कामगार परवाना **(Labour License)** नोंदणी प्रमाणपत्र.

११) अटी व शर्तीची निविदाकराची सही व शिक्का

तांत्रीक लिफाफा मध्ये नमुद केलेली सर्व कागदपत्रे छायांकित प्रतीत वर दिलेल्या क्रमानेच सादर करण्यात यावी. तसेच सादर केलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर करण्यात याव्यात. कंत्राटदाराने दरपत्रक अर्जासोबत सदर प्रमाणपत्रे सादर न केल्यास, दरपत्रक अर्ज निविदा प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल.

सर्वप्रथम तांत्रीक लिफाफा उघडण्यात येईल. तांत्रीक लिफाफा उघडताना निविदाकार अथवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी हजर राहणे आवश्यक आहे व त्यावेळेस त्यांनी प्रमाणपत्राच्या मुळ प्रती पडताळणीसाठी हजर ठेवणे आवश्यक आहे. जर निविदाकार तांत्रीक निविदेमध्ये नमुद केलेल्या बाबींची पुर्तता करीत नसेल तर त्यांचे दरपत्रक अपात्र ठरविण्यात येईल व सदर निविदाकाराची आर्थिक निविदा पुढील कार्यवाहीसाठी ग्राहय धरण्यात येणार नाही. पात्र ठरणा—या निविदाकरांचीच आर्थिक निविदा उघडण्यात येईल. निविदेमध्ये नमुद केलेली निविदा स्विकारण्याची व उघडण्याची तारीख पुढील कार्यालयीन दिवस व नियोजित वेळेस राहील. आर्थिक

Scanned with OKEN Scanner

निविदेमधील रक्कम तांत्रीक निविदेमध्ये नमुद करण्यात येउ नये, जर तसे आढळल्यास संबंधीत निविदाकाराची निविदा बाद ठरविण्यात येईल.

**ब) आर्थिक (दराचा) निविदा — ( लिफाफा क्रमांक — ०२ )**

१) निविदेचे दर हे दरपत्रक यामध्ये कोणत्याही कराची रक्कम समाविष्ठ नाही.

२) आर्थिक निविदेमध्ये निविदाकराने नमुद केलेले दर निविदेमधील सर्व अटी व शर्तीची पुर्तता करीत असेल, तर पुढील कार्यवाहीसाठी दरपत्रक ग्राहय धरण्यात येईल.

३) निविदा स्विकारण्याचा अधिकार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गोंदिया यांना असतील व कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार पण असेल.

**क) सर्वसाधारण अटी व शर्ती —**

१) कंत्राटदाराने न्यायालयाचे कामकाजासाठी नेमलेल्या कंत्राटी कामगारांना किमान वेतन कायदयातील तरतुदींपेक्षा कमी वेतन अदा केल्याचे निर्देशनास आले, तर संबंधीत कंत्राटदारावर किमान वेतन कायदयातील तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यात येईल व त्यांचे कंत्राट तात्काळ रद्द करून त्यांचे नाव काळया यादीत टाकण्याची कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

२) कंत्राटदाराने कंत्राटी कामगारांना कामाचे वेतन व त्या अनुषंगीक इतर सर्व भत्ते रोख स्वरूपात अदा न करता संबंधीत कंत्राटी कामगाराच्या नावाने रेखांकित धनादेशाद्वारे अदा करावेत.

३) कंत्राटदाराने कंत्राटी कामगाराला दिलेल्या धनादेशाची, छायांकित प्रत, सदर धनादेश स्विकारल्याची कंत्राटी कामगाराची स्वाक्षरी असलेले वेतन देयक (ज्यावर सदर धनादेश क्रमांक लिहीलेला असेल), कंत्राटदाराने दरमहा संबंधीत कार्यालयात सादर करावे लागतील. जोपर्यंत कंत्राटदार वरील कागदपत्रे सादर करणार नाहीत, तोपर्यंत त्या महिन्याचे कंत्राटदाराचे देयक अदा करण्यात येणार नाही.

४) कंत्राटाचा कालावधी कोणत्याही परिस्थितीत एका वर्षापेक्षा जास्त राहणार नाही.

Scanned with OKEN Scanner

५) किमान वेतन कायदयातील तरतुदीनुसार कंत्राटदाराने कंत्राटी कामगारांना भरपगारी साप्ताहिक सुट्टी देणे बंधनकारक असेल व अशा सुट्टीचे दिवशी कार्यालयास कंत्राटी कामगारांच्या सेवेची आवश्यकता भासल्यास त्याचे ऐवजी दुसरा कामगार उपलब्ध करून देण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

६) सुट्टीच्या दिवशी कंत्राटी कामगाराकडुन काम करून घेतल्यास त्या दिवसाची बदली रजा देण्यात यावी. मात्र अशी बदली रजा देताना त्यादिवशी कार्यालयातील कामकाजाचा खोळंबा होवू नये म्हणून दुस-या कामगाराची सोय करण्याची संपुर्ण जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

७) शासकीय कामाचे वेळेनंतर कंत्राटी कामगारांना जास्तीचे शासकीय काम करावे लागल्यास त्यांना अतिकालीन भत्ता देणे कंत्राटदारास बंधनकारक असेल व सदर अतिकालीन भत्ता देण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

८) कंत्राटदारास त्यांनी नेमलेल्या कंत्राटी लिपीक टंकलेखक व शिपाई यांना किमान वेतन अधिनियम १९४८ मधील तरतुदीनुसार वेतन, इतर सवलतील व सेवा शर्ती लागु करणे बंधनकारक असेल.

९) ज्या कंपनीस/ संस्थेस काम सोपविण्यात येईल त्यांनी त्या बाबतच्या अटी व शर्ती नुसार करार करणे आवश्यक राहील.

१०) कंपनी/ संस्थेतर्फे काम करणा-या कर्मचा-यांचे संवेचे कोणतेही उत्तरदायीत्व शासनावर किंवा कार्यालयावर राहणार नाही.

११) सदरील निविदा शासनाकडून प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर ती अंमलात येईल.

१२) कंत्राटदारामार्फत दिल्या जाणा-या सेवा / सुविधा इत्यादीबाबतच्या कार्यपध्दतीचा व कामाचा आढावा कार्यालयामार्फत वेळोवेळी घेण्यात येईल व वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील.

१३) न्यायालयास कंत्राटी पध्दतीवर पुरविण्यात येणा-या सोई-सुविधा/काम यांचेसाठी जी कंत्राटी सेवा कंत्राटदारामार्फत उपलब्ध करून देण्यात येणार आहे, त्याअनुषंगाने लागु अणारे सर्व कर कंत्राटदाराने अदा करावेत.

Scanned with OKEN Scanner

१४) कंत्राटदार संस्था/कंपनी यांनी कंत्राटी सेवा उपलब्ध करून देताना, शासन निर्णय विधि व न्याय विभाग, ३ सप्टेंबर, २०१४, विधि व न्याय विभाग दि. २७ जानेवारी, २०१५, विधि व न्याय विभाग दि. २३ फेब्रुवारी २०१७, विधि व न्याय विभाग दि. ९ ऑगस्ट, २०१७, शासन निर्णय वित्त २ ऑगस्ट, २०१६ व शासन निर्णय क्रमांक–पदनि–२०२२/प्र.क्र.१५/आ.पु.क दि. २७ एप्रिल, २०२२ मधील निर्देशांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे. सदर शासन निर्णय शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१५) उपरोक्त कामासाठी कंत्राटदारामार्फत ज्यांना काम देण्यात येणार आहे, त्यांना नियमित कर्मचा–यांप्रमाणे नियम व अटी व शर्ती लागू राहणार नाहीत. तसेच त्यांना नियमित कर्मचा–यांप्रमाणे कोणतेही वेतन व भत्ते तथा अनुषंगिक लाथ अनुज्ञेय/लागु राहणार नाहीत. त्यांच्या सेवा कालावधी किंवा कर्तव्य कालावधी व मानधनाबाबत हे कार्यालय कसल्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

१६) नियुक्ती प्रधिका–याने सुचविलेली सर्व कामे तसेच आयत्यावेळी कामाचे स्वरूप बदलल्यास त्याप्रमाणे, कंत्राटदार संस्था/कंपनी यांनी कामे करून देणेचे त्यांचेवर बंधनकारक राहिल.

१७) कंत्राटदाराने कंत्राटी कामगार पुरविताना त्यात बाल कामगारांचा समावेश होणार नाही यांची दक्षता घ्यावी.

१८) कंत्राटदाराने अर्जासोबत आवश्यक ती बयाणा रक्कम शासकीय नियमाप्रमाणे जमा करावी लागेल.

१९) कंत्राटदाराने/संस्थेने /कंपनीने त्यांचे तांत्रीक निविदेतील सर्व कागदपत्राची सांक्षांकित प्रत निविदेसोबत सादर करणे बंधनकार आहे. सदर कागदपत्रे न जोडल्यास त्यांचा निविदा अर्ज रद्द ठरविण्यात येईल.

२०) कंत्राटदारास कंत्राटी कामाचा मोबदला अदा करताना त्यातुन नियमाप्रमाणे आयकर कापून घेणेत येईल.

Scanned with OKEN Scanner

२१) कंत्राटी कामगारांनी कार्यालयात काम करताना तयांच्या नजरेस ज्या काही बाबी येईल, त्या कार्यालयीन बाबी आहेत याची जाणीव ठेवून त्यासंबंधात आवश्यक ती गोपनियता ठेवणे, तसेच न्यायालयीन कामकाजात कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप होणार नाही याची दक्षता घेणे, याबाबी कंत्राटदारावर बंधनकारक राहतील.

२२) कंत्राटदारामार्फत नेमलेल्या कंत्राटी कामगारांकडून सरकारी मालमत्तेचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आल्यास, नुकसान भरपाईची रक्कम कंत्राटदार यांना देय असलेल्या रकमेतुन वसुल करणेत येईल.

२३) केवळ वरील कामाचे दरपत्रक भरतील म्हणून कंत्राटावर हक्क सांगता येणार नाही.

(ए. टी. वानखेडे)
अध्यक्ष,
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश
गोंदिया

Scanned with OKEN Scanner

## आर्थिक निवीदा ( लिफाफा क्रमांक ०२ )

**निविदा मागविणा—या कार्यालयाचे नाव** : जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय, गोंदिया

**कामाचे स्वरूप** : जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गोंदिया येथे एक वर्ष मुदतीच्या कालावधीकरीता सफाईगार/कामगार यांची सेवा बाह्ययंत्रनेद्वारे कंत्राटी पधतीने उपलब्ध करून घेणेबाबत.

(सदर कामाची सविस्तर माहिती/अटी, शर्ती तसेच कामाचे स्वरूप दर्शविणारे विवरणपत्र सोबत जोडले आहे.)

निविदा क्रमांक : जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय, गोंदिया

कंत्राटदार संस्थेचे/ कंपनीचे नाव :—

कंत्राटदार संस्थेचे/ कंपनीचा संपुर्ण पत्ता :—

कंत्राटदार संस्थेचे/ कंपनीचा संपर्क दूरध्वनी :—

कंत्राटदार संस्थेचे/ कंपनीचा नोंदणी क्रमांक :—

कंत्राटदार संस्थेचे/ कंपनीचा सेवा कर क्रमांक :—

कंत्राटदार / संस्थेने पुढील तक्त्याप्रमाणे माहिती भरून द्यावी...



Scanned with OKEN Scanner

| अ. क्र. | न्यायालयाचे नांव | पदसंख्या | कंत्राटी सेवा पुरविणेसाठी कंत्राटदाराने मागणी केलेली एकूण रक्कम (१ वर्षाकरीता खर्च रूपये) सर्व कराव्यतिरीक्त | जी. एस. टी (१ वर्षाकरीता खर्च रूपये) | एकुण रक्कम रूपये (स्तंभ ४ + ५) | एकुण रक्कम (रूपये) अक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय, गोंदिया | **पदसंख्या —**<br>सफाईगार — २<br>मजुर — १<br><br>असे एकुण ०३ | | | | |
| | एकुण | | | | | |

निविदेची एका वर्षासाठी होणारी रक्कम : रूपये. ......................................./—

(अक्षरी एकूण रूपये ..........................................................................)

कंत्राटदाराचे नाव }

सही }

शिक्का }

दिनांक }

ठिकाण }

(अ.क्र.४ ते ७ हृया स्तंभातील माहिति कंत्राटदाराने भरावयाची आहे.)



Scanned with OKEN Scanner